*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---



## UNIT 2

# PLATO

## प्लेटो

2.1 : परंपरेला प्रतिसाद : सोफिस्टांचा सापेक्षतावाद आणि संशयवाद, सत् आणि भवन.

2.2 : मत आणि ज्ञान

2.3 : चिद्वाद (कल्पनावाद Theory of Forms/ Ideas)

2.4 : ज्ञान म्हणजे पुनर्स्मरण.


---

### प्रस्तावना

**ग्री**क तत्त्वज्ञानाने पाश्चात्य आणि युरोपीय तत्त्वज्ञानाचा पाया घातला.ते परंपरेचा भाग बनले.म्हणून ग्रीक विचार पारंपरिक समजले जातात.प्लेटो (इ.स.पू. 427 ते 347) हा ग्रीक तत्त्वज्ञ साऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा मूलाधार समजला जातो, म्हणून त्याचे तत्त्वज्ञान हेच पारंपररिक तत्त्वज्ञान बनले. त्याच्या तत्त्वज्ञानावरच सगळ्या जगाची संस्कृती एकेकाळी अवलंबून होती.प्लेटोला 'तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी' समजले जाते.सॉक्रेटीसची महती त्याच्यामुळेच साऱ्या जगाला कळाली. प्लेटोने त्याच्या तत्त्वज्ञानात सॉक्रेटीसला मध्यवर्ती स्थान दिले.त्याच्या संवाद पध्दतीतील सॉक्रेटीस हेच महत्वाचे पात्र आहे.

**PLATO**

CLASSICAL GREEK PHILOSOPHER,
MATHEMATICIAN,
STUDENT OF SOCRATES,
WRITER OF PHILOSOPHICAL DIALOGUES.
FOUNDER OF THE ACADEMY IN ATHENS.
ALONG WITH HIS MENTOR, SOCRATES, AND
HIS STUDENT, ARISTOTLE,
PLATO LAID THE FOUNDATIONS OF
WESTERN PHILOSOPHY AND SCIENCE




ज्या जगाचा आपण अनुभव घेतो त्यात सत्य काय आणि आभास काय हे ठरवावे लागते. हे निश्चित करणारी तत्वज्ञानाची शाखा म्हणजे 'वस्तुमीमांसा' (Ontology)होय. प्रत्येक तत्ववेत्ता वस्तुमीमांसाशास्त्रातील वरील महत्वाच्या समस्येचा विचार करतो. प्लेटोसुदधा तो केला. हा विचार म्हणजे आयडिया सिध्दांत होय. तोच त्याचा ज्ञानसिध्दांत असून प्लेटोने त्याचा ज्ञानसिध्दान्त **'थिएटेटस'** आणि **'फीडो'** या दोन संवादात प्रामुख्याने मांडला.त्याच्या मते कोणत्याही समजुतीला, मताला, विश्वासाला ज्ञान म्हणता येत नसते. ज्ञान ही एक विशिष्ट प्रकारची रचना आहे.

प्लेटोच्या आधी सोफिस्टांचे तत्त्वज्ञान ग्रीक संस्कृतीत प्रचलित होते. तीच परंपरा होती. पण प्लेटो सोफिस्ट तत्त्वज्ञांवर टीका करून त्याचा ज्ञानसिध्दांत मांडतो. त्याचेच तत्त्वज्ञान इतके मूलभूत ठरले की ग्रीक परंपरा प्लेटोपासून सुरु झाली, असे म्हणावे लागते. त्या परंपरेवर टीका करून म्हणजे सोफिस्टांना टीका करून प्रतिसाद देत

प्लेटोचा विचार विकसित झाला.त्यामुळे आधी सोफिस्टांचे तत्त्वज्ञान आपणास काय सांगते, ते पाहणे आवश्यक आहे.



## 2.1: प्लेटोचा परंपरेला प्रतिसाद

### सोफिस्टांचा सापेक्षतावाद आणि संशयवाद

आपल्या जगाचे निरीक्षण केले असता असे आढळते की जगाचे ज्ञान आपल्याला प्रत्यक्ष इंद्रियांमार्फत होत असते आणि ज्ञानाचा विषय असलेल्या या जगात सतत बदल घडत असतात.वेगवेगळे ऋतू, वातावरण, हवामान,पशुपक्षी माणसे यात सतत परिवर्तन घडत असते. जगाचे स्वरुप नाशवंत आणि क्षणभंगुर आहे. ''जगाचे स्वरुप बदलते आहे म्हणून ज्ञान असणारे सत्यही बदलते असते.ज्याला जसे दिसते ते त्याच्या दृष्टिने व त्याच्यापुरते सत्य असते'' अशी भूमिका सॉक्रेटीस व प्लेटोपूर्व कालात **सोफिस्ट तत्त्वज्ञ** मांडतात.

सोफिस्टांच्या मते ज्ञानाचे साधन केवळ इंद्रीये हीच असून सर्व ज्ञान इंद्रियांमार्फतच होत असते.ज्ञान होते याचा अर्थ इंद्रिय *संवेदना* मिळतात. वेगळ्या भाषेत ज्ञान केवळ संवेदनांचेच असते.आणि संवेदनांचा विषय केवळ भौतिक जग हेच आहे.म्हणूनच व्यक्तीगत पातळीवर माणसाला मिळणारे इंद्रियसुख हेच ज्ञानाचे मुख्य विषय आहेत.तेच जीवनात महत्वाचे असतात.त्यांच्या मते ज्ञान बुध्दिने /विवेकशक्तीने होवू शकत नाही.'सत्याचे ज्ञान ' अशी काही संकल्पनाच नसते, असेही काही सोफिस्टांचे म्हणणे होते.

सोफिस्टांच्या मतानुसार इंद्रियसंवेदनामार्फत ज्ञान होते.पण ते सतत बदलते असते.ज्याच्या त्याच्यापुरते ते सत्य असते.जे स्थिर होते, अपरिवर्तनीय असते ते ज्ञान नसते,तर असत्य असते. सोफिस्टांच्या तत्त्वज्ञानामुळे काही गंभीर परिस्थिती उद्‌भवली होती. ज्ञान, जग, घटना, व्यक्ति सगळेच बदलते, फसवे झाल्याने ग्रीक समाजात एकच गोंधळ माजला होता. तो प्लेटोने दुरुस्त केला.

प्लेटोच्या मते सोफिस्ट ज्याचे गुणगान गातात ते जग ही सतत बदलणारी वस्तू आहे. साहजिकच जगाचे ज्ञानही बदलत राहते. ज्ञान चंचल,सतत बदलत असल्याने नेमके कशाचे ज्ञान होत आहे,हे सांगणे शक्य होत नाही.अशा ज्ञानाला 'ज्ञानाचा दर्जा' प्राप्त होवूच शकत नाही.मग ते निसर्गाचे असो की मानवी समाजाचे असो , मानवी मूल्यांचे असो, ते सत्यज्ञान असू शकत नाही.शिवाय भौतिक जग इतके अमर्याद आहे की त्याचे ज्ञान माणसाला होणे जवळपास अशक्यच असते.त्यामुळे त्यामागे धावणे चुकीचे आहे.

प्लेटोच्या मते, जगाचे ज्ञानही बदलत राहिले तर आपणास निश्‍चित ज्ञान होवू शकत नाही. अशा बदलत्या जगाचे ज्ञानही सतत बदलते,क्षणभंगुर आणि तात्पुरतेच राहाते.पाण्यात बुडालेली काठी वाकडी दिसते म्हणून ती वाकडी असत नाही. तिचे खरे स्वरुप वेगळेच असते.ज्याला जसे ज्ञान होते तसे ते असते, असे म्हंटले तर सत्य व असत्य यात फरक करणे शक्य होणार नाही.असे झाल्यास लोक असत्यालाच सत्य समजतील आणि सत्याला असत्य समजतील. मग एकच गोंधळ होईल.सोफिस्टांची ही भूमिका अतिरेकी, व्यक्तिकेंद्री,सापेक्ष,चंचल,फसवी, उथळ व परस्परविरोधी आहे.त्यात अचूकता,स्थिरता,एकवाक्यता नाही.

दुसरे असे की संवेदनांमार्फत मिळणारे इंद्रियसुख क्षणभंगुर असते.ते वासना सतत निर्माण करीत राहते. त्यातूनच व्यक्ती व समाज अनैतिक वर्तन करतात. शोषण, विषमता, अन्याय यांचा उगम इंद्रिय सुखातूनच होतो. याचाच अर्थ ज्ञानाची सोफिस्टांची कल्पना समाजात दुर्गुण पसरविते.अनाचार माजविते.

थोडक्यात सोफिस्टांनी मांडलेल्या ज्ञानशास्त्रातूनज्ञानाच्या क्षेत्रात आणि नीतीच्या क्षेत्रात साक्षेपतावाद आणि संशयवाद निर्माण झाला.सोफिस्ट तत्त्वज्ञांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानामुळे सामाजिक अराजक माजले होते.लोकशाहीचा चुकीचा अर्थ लावला जावून अनैतिकताच पसरली होती.लोकशाही काही मूठभर धनिकांच्या हातचे खेळणे बनली

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



होती.लोकशाहीची ही संकल्पना संकुचित व मर्यादित होती. 'सत्य' या संकल्पनेविषयीचे अज्ञान आणि चुकीची व दिशाभूल करणारी ज्ञानाची संकल्पना, हेच अथेन्समधील तत्कालिन सर्व प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातील अराजकाचे कारण होते.

### सोफीस्टांवरील टीका

सत्य हे सापेक्ष व परिवर्तनीय असते,हा सोफीस्टांचा सिध्दांत जसा सॉक्रेटिसला मान्य नव्हता तसा प्लेटोलाही मान्य नाही. सॉक्रेटीस जशी टीका करतो तशाच प्रकारची टीका प्लेटोही सोफीस्टांवर करतो. त्याच्यामते इंद्रिंय संवेदना हा काही ज्ञानाचा मार्ग होऊच शकत नाही.कारण इंद्रिंये आपल्या स्वभावानुसार चंचल व अस्थिर असतात. परिणामी इंद्रियप्राप्त ज्ञान सुदधा चंचल व अस्थिर असते. प्लेटोच्या मते,

1. इंद्रिय संवेदन हे संपूर्ण ज्ञान नसते. कारण ज्ञानविषयांमध्ये केवळ वस्तूचा समावेश होत नाही तर शब्द व विचार यांचाही समावेश होतो. त्यांचे ज्ञान काही इंद्रियांनी होत नसते.
2. प्रत्येक व्यक्तीचे इंद्रिय संवेदन भिन्न-भिन्न असते; परिणामी त्यावर आधारलेले ज्ञान सुदधा भिन्न-भिन्न,व्यक्ती सापेक्ष तर बनते. अशा बदलत्या ज्ञानाला 'खऱ्या अर्थाने' ज्ञान हा दर्जा देता येत नाही.
3. इंद्रिय संवेदन हाच ज्ञानाचा मार्ग मानला तर एकाच व्यक्तीची एकाच वस्तू बद्दलची विधाने परस्पर विरोधी होऊ शकते. कारण जसे ज्ञान कळेल तसे ती व्यक्ति विधान करेल. मग हे ज्ञान संशयास्पद होते.
4. मुख्य म्हणजे इंद्रियसंवेदनप्राप्त ज्ञान नेहमी संदेहास्पद व संशयास्पद असते. आधारात दोरीच्या ठिकाणी साप दिसतो. सूर्य उगवलेला दिसतो पण तो उगवत नसतो तर पृथ्वी ही फिरत असते.
5. याशिवाय सगळे ज्ञान काही इंद्रियगम्य नसते.उदा.गणिती उदाहरणे, साम्य, भेद, तर्क इ.

अशा रितीने इंद्रिय संवेदन प्राप्त ज्ञान संदेहास्पद व संशयास्प्द असल्याने इंद्रिय संवेदना हा सत्य ज्ञानाचा मार्ग असू शकत नाही. यावरुन प्लेटो निष्कर्ष काढतो तो असा :

अ. ज्ञानप्राप्ती साठी इंद्रिय संवेदन हे विश्वासार्ह साधन नाही.

ब. सर्व ज्ञानासाठी इंद्रिय संवेदन हे ज्ञानसाधन पुरेसे नाही.

या पार्श्वभूमीवर ज्ञान म्हणजे काय ज्ञानाचे निकष, ज्ञानाची वैशिष्ट्ये, व ज्ञानाचा विषय कोणता यांची चर्चा करतो. यातून त्याचा ज्ञानसिध्दांत म्हणजे आयडिया सिध्दांत विकसित होतो. म्हणून प्लेटो त्याची ज्ञानाची संकल्पना पुढीलप्रमाणे मांडतो. त्यासाठी तो विश्वास आणि ज्ञान यात फरक करतो.

## 2.2 : मत आणि ज्ञान : प्लेटोची ज्ञानाची संकल्पना

### ज्ञानाच्या दोन पातळ्या


प्लेटोच्या मते ज्ञानाच्या दोन पातळ्या आहेत. एक नीच, अप्रगत पातळी आहे तर दुसरी उच्च, प्रगत पातळी आहे.अगप्रत अवस्थेतील ज्ञान म्हणजे **'मत'(Opinion)** असते तर प्रगत व उच्च पातळीवरील ज्ञान हे खरे **'ज्ञान' (Knowledge)** असते.मत म्हणजे सतत बदलणाऱ्या जगाची माहिती असून ते चंचल,फसवे आहे.ते इंद्रीय संवेदनाने मिळते.या माहितीलाही आपण ज्ञान ही संज्ञा वापरतो, हे खरे.पण त्यास ज्ञान म्हणता येत नाही, हेच तर प्लेटोचे म्हणणे आहे. 'ज्ञान' ही विशिष्ट रितीने वापरली जाणारी संज्ञा असून तिला खूप खोल अर्थ आहे.तथापि तो लक्षात न घेतला गेल्यामुळे 'ज्ञान' ही संज्ञा अतिशय सैलसर अर्थाने वापरली जाते. परिणामी या संज्ञेविषयी पर्यायाने या संकल्पनेविषयी गैरसमज पसरतात, असे प्लेटोला लक्षात आणून द्यावयाचे आहे.यासाठीच तो 'ज्ञान' आणि 'मत' या दोन संकल्पनांमध्ये फरक करतो. 'ज्ञान' या संज्ञासंकल्पनेचा अर्थ नेमका, बांधीव करतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

---

## गुहेची रुपक कथा

प्लेटो आपणास एका गुहेची कल्पना[1] करावयास सांगतो. या गुहेचे प्रवेशद्वार प्रकाशाकडे आहे. या गुहेत काही माणसांची तोंडे ती जन्मल्यापासून भिंतीकडेच राहतील, त्यांना कधीही प्रकाश दिसणार नाही अशा पध्दतीने बांधून टाकलेले आहेत.ला ते जरा सुदधा हालचाल करु शकत नाही. ते कैदी आणि गुहेचे तोंड यांच्या दरम्यान पेटलेला अग्नी असून कैदी व अग्नी यांच्या मध्ये एक रस्ता आहे. या रस्त्यावर लोक ये - जा करतात. कैद्यांच्या डोक्याच्या वरच्या बाजूला थोडेसे मागे एक पडदा आहे या पडदयावर त्या रस्त्यावरुन येजा करणा-यांच्या सावल्या पडतात. तिथे काही खेळही होतात. त्यांच्याही सावल्या दिसतात. कैदीही स्वत:ची सुटका करु शकत नाही.एकमेकांकडे पाहू शकत नाही. फक्त समोर पाहू शकतात आणि त्यांना दिसतात त्या सावल्या. सावल्यांनाच पाहून येजा करणा-यांची कल्पना कैदी करतात आणि त्यांनाच सत्य समजतात.




या रुपक कथेतील कैदयांप्रमाणे सामान्य माणसे स्वत:च्या वासना इच्छा, विकार यांच्या बंधनात बांधलेली असून केवळ सावल्यांनाच सत्य समजणारी आहेत. या सावल्या म्हणजे मत. ही माणसे जन्मभर मतांच्याच पातळीवर राहतात. त्यांचे सगळे आयुष्य दूषित पूर्वग्रहयुक्त असते. आणि त्यातून ते बाहेर येऊ इच्छित नाहीत. जग अशाच माणसांनी भरलेले आहे.

पण समजा अशा अनंत कैदयापैकी एखादा सूदैवाने सुटून आला. त्याच्या लक्षात आले की आपण आजपर्यंत पाहत आलो आहोत, त्या केवळ प्रतिबिंबे, प्रतिमा आहेत. मूळ नाही. मग सत्याच्या शोधात तो तसाच पुढे

---

[1] गुहेची कल्पना प्लेटोच्या 'रिपब्लिक'(***The Republic***) या संवादात मांडली आहे.सॉक्रेटीस आणि त्याचा भाऊ ग्लुकॉन यांच्यात शिक्षणाबद्दल चर्चा होते, असा प्रसंग असून तेंव्हा सॉक्रेटीस ही रूपक कथा सांगतो. Book VII (chapter IX Robin Waterfield यांचे भाषांतर 514a-520a).

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

गेला तर त्याला बाहेरच्या अग्नीच्या प्रकाशात, सूर्याच्या लख्ख प्रकाशात वास्तव जगाचे ज्ञान मिळेल. ज्यांच्या सावल्यास तो पाहत होता, त्या व्यक्ती वस्तूंचे दर्शन घेईल. त्याला सत्य ज्ञान लाभेल.

आता, असेही समजू की असा ज्ञानी माणूस परत गुहेत गेला आणि तो सद्‌गुणी असल्याने सदभावनेने आपल्या सोबत्यांना बाहेरचे सत्य सांगू पाहेल. पण अर्थात ती त्यांना खरी न वाटता खोटी वाटतील. कारण त्यांना कधीच सत्यज्ञानाचे दर्शन झालेले नसते. परिणामी ते कैदी त्या सद्‌गुणी ज्ञानवंतावर आरोप करतील, प्रसंगी ठारही मारतील. आणि तो सत्यप्रेमी सत्यासाठी प्राणदान देईल!



**(The Matrix या इंग्लीश चित्रपटातील हे दृश्य असून The Matrix ही गुहेची आधुनिक रूपक कथा म्हणता येईल.)**

अशी ही रुपक कथा आहे.

आता, प्लेटो ज्ञानाचे निकष सांगतो.

प्लेटोच्या मते ज्ञानाची दोन प्रमुख लक्षणे किंवा निकष आहेत.

## ज्ञानाचे निकष

1) ज्ञान अचूक,अप्रमाद्‌य (infallible) असते.या ज्ञानात कसलीही चूक किंवा प्रमाद होवूच शकत नाही.
2) असे ज्ञान नेहमी सत्य असले पाहिजे.

सत्य ज्ञान अचूक व वस्तुनिष्ठ नेहमी शाश्वत, स्थिर सर्वकालिक सार्वदशिक व नैतिक मूल्यांनी युक्त असले पाहीजे. याचाच अर्थ त्याला कसलीही आधा येता कामा नये. 2+2=4 किंवा तीन कोन किंवा तीन बाजूंची आकृती म्हणजे त्रिकोण, हे ज्ञान सर्वकाळात कोठेही कधीही अपरिवर्तनीयच असते. थोडक्यात जे देशकाल निरपेक्षच अबाधित असते ते सत्यज्ञान होय.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

प्लेटो दृश्य जगाला सदासद् वस्तूंचे जग (world of becomings) असे म्हणतो, तर आयडीयाच्या जगाला सत्चे जग (World of beings) असे म्हणतात.'सत्' चे जग हेच मूळ वास्तव जग असते.तर वस्तूंचे जग भासमान, प्रत्ययांचे जग (Appeared world) असते.म्हणजे 'सत्' चे आयडीयांचे जग हेच खरे जग असून वस्तूंचे जग मात्र मिथ्या भासमय जग आहे.

ज्ञानाच्या निकषानंतर प्लेटो हे ज्ञानाचा विषय कोणता असतो, याची चर्चा करतो.

**ज्ञानाचा विषय :**

वस्तुनिष्ठता आणि देशकाल निरपेक्षता ही दोन ज्ञानाची वैशिष्ट्ये सांगून जी ज्यात असतात किंवा ते ज्याचे ज्ञान असते,त्या विषयांचे स्वरुप सुदधा प्लेटो सांगतो. त्याच्या मते ज्ञानाचे स्वरुप जसे असते, तसेच ज्ञानविषयाचे स्वरुप सुदधा असले पाहीजे. मग ही दोन ज्ञानाची वैशिष्ट्ये असलेले ज्ञानविषय कोणते ?

प्लेटोच्या मते ज्ञानाचा विषय जग किंवा जगातील विशिष्ट वस्तू नसतात. विशिष्ट वस्तूंनी बनलेले जग इंद्रियांचा विषय असतो,बुध्दिचा नाही. सत्य ज्ञान बुध्दिला / विवेकाला होते. इंद्रियानुभवातून मिळणारे ज्ञान जेव्हा भाषेतून व्यक्त करतो तेव्हा या विशिष्ट वस्तूंचे ज्ञान आपण व्यक्त करतो.पण या विशिष्टामधूनच आपणास अन्य **'काहीतरी'** ज्ञात होत असते. ते त्याचे तत्त्व असते. उदाहरणार्थ, सिंह या विशिष्ट प्राण्यांचे ज्ञान होताना 'सिंहत्व' या तत्त्वाचेही ज्ञान होते. हा सिंहामधील समान गुणधर्म असतो.त्रिकोणांमधून 'त्रिकोणत्व' ज्ञात होते. किंबहुना 'त्रिकोणत्व' मुळे जगातील सर्व प्रकारचे त्रिकोण कळतात. वेगळ्या भाषेत सर्व सिहांत किंवा त्रिकोणात काहीतरी समान गुणधर्म असतो कि ज्यामुळे तो प्राणी सिंह आहे की आकृती त्रिकोण आहे, हे ठरविता येते; तो समान गुणधर्म म्हणजे 'सिंहत्व' किंवा 'त्रिकोणत्व' होय. यासामान्य गुणधर्मांना प्लेटो सामान्य (Universal) म्हणतो.

## प्लेटोचा चिद्वाद / आयडीया सिदधांत

प्लेटोच्या मते ज्याचे आपणास ज्ञान होते ती वस्तू नसते तर त्या वस्तूची 'कल्पना' असते. ही कल्पना त्या वस्तूचे सारतत्त्व (essence) असते.वस्तूमध्ये असणारा समान गुणधर्म म्हणजे आयडिया होय. नाणे, बांगडी, भाकरी, चपाती इत्यादी गोल वस्तूंमध्ये गोलपणा किंवा वर्तुळ नावाचा समान गुणधर्म असतो.अनेक घोड्यांमध्ये अश्वत्व,माणसातील मनुष्यत्व,या आयडिया असतात. त्रिकोण, चौकोन, चौरस,एक,दोन,तीन,झाड,नदी इ. इ. आयडिया असतात. जी जी वस्तू अथवा व्यक्ति प्रत्ययास येत असते तिची एक स्वतंत्र त्या सर्व वस्तूंना समान अशी आयडिया असते. (संगणकांमध्ये संगणकत्व ही आयडिया असते, असे म्हणता येईल.)

अनेक माणसांमध्ये मनुष्यत्वाचे सूचक असे काही गुणधर्म असतात.''विचारशील प्राणी असणे[2]''हा तो गुणधर्म होय. सर्व माणसांमध्ये समान रुपाने उपस्थित असणारा हा समान गुणधर्म एका अर्थाने या सर्व माणसांचे 'सारतत्व' असते (essence).माणसांच्या बाबतीत जशी आयडीया असते,तशी अनेक वस्तूंचीही असते.दाहक असणे व प्रकाशमान असणे हे सर्व अग्नींचे समान गुणधर्म होत. म्हणजे अग्नींचे अग्नीत्व दाहकत्व व प्रकाशमान असण्यातच असते. एखाद्याने अग्नीत हात घातला असता तो भाजला नाही त्यास आपण अग्नी म्हणणारच नाही.

---

[2]माणसाचे मनुष्यत्व त्याच्या विचारशीलतेवर अवलंबून असते. "एखादा माणूस शरीराने माणूस असला परंतु तो विचारच करत नसला तर त्यास माणूस का म्हणावे?" हा प्रश्न उद्भवतो. (म्हणूनच अशा लोकांना साध्या भाषेत, विनोदाने नंदीबैल गाढव असे म्हंटले जाते. प्राण्यात आणि त्याच्यात फरक नाही असे काही सचित करायचे असते. म्हणजेच विचारशील प्राणी असे हा जसा सर्व माणसाचा समान गुणधर्म आहे तसा तो सर्व माणसांचा "सारभूत गुणधर्म /सारसत्व" असते. अशा सारतत्वालाच प्लेटो आकार किंवा आयडीया म्हणतो.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

या जगातील प्रत्येक पदार्थ, प्राणी व व्यक्ती यांची सारतत्त्वे (आयडीया) असतात. टेबल, खुर्ची, गाढव, झाडे, फुले, सुंदर, वस्तू, व्यक्ती सर्वाच्या आयडीया असतात.जसे एखाद्या मूर्तीचा साचा असतो आणि त्या साचाच्या साहाय्याने अनेक मूर्ती घडवल्या जातात त्याप्रमाणे सर्व पदार्थांच्या सारतत्वांला अनुरुप असलेला असाच पदार्थ अस्तित्वात येतो. हा साचा म्हणजे सारतत्व असते.उदा. टेबल या वस्तुचे टेबलत्व असे सारतत्व किंवा आयडीया असते. सपाट पृष्ठभूमी असणे, पाय असणे हे त्याचे लक्षण असते. मग ते टेबल चौकोनी आयताकृती त्रिकोणी गोल कसेही असते ते कसेही असले तरी त्यात टेबलत्व नसेल तर त्यास टेबल म्हणता येत नाही. सर्व झाडांमध्ये वृक्षत्व असते आंबा, पेरु, चिकू, सालसाग, ताड अशा सर्व वृक्षांमध्ये निरनिराळया वृक्षांमध्ये वृक्षत्व असते, विविध फळांमध्ये फलत्व असते. अशा त-हेने शेकडो वस्तूंमध्ये व त्या वस्तूचे सारतत्व किंवा आयडीया असते.

आता जग वस्तूंनी जसे भरले आहे तसे अनेक संकल्पनांनी भरलेले आहे. चौकोन गोल 1,2,3 चुक बरोबर, गुणीले, भागीले इ. अशा संकल्पनां आहेत. त्यातही प्रकार असतात. सर्व संख्यांमध्ये संख्यात्व ही संकल्पना असते.सर्व त्रिकोणांमध्ये त्रिकोणत्व, चौकोनांमध्ये चौकोनत्व, सर्व वर्तुळांमध्ये वर्तुलत्व ही आयडीया असते.एवढेच नव्हेतर या सर्व आकृतींमध्ये ''आकृतीत्व'' किंवा 'काहीतरी आकार' ही आयडीया आहे.

अशा रितीने प्रत्येक वस्तू, व्यक्ती, यांच्या आयडीया असतात. आयडीया भाषेमध्ये नेहमीसामान्य पदातून व्यक्त होतात. सिंह, प्राणी, त्रिकोण, आकृती ही सामान्यपदे आहेत.या पदांचा अर्थ निश्‍चित करण्यासाठी त्यांची व्याख्या केली जाते. आता, प्लेटोच्या मते, पदाची व्याख्या करण्यातूनच त्या वस्तू इत्यादीमागील चेतनतत्त्व व्यक्त होणे होय. वर्णन करणे म्हणजे व्याख्या बनविणे. अमुक अमुक वर्णन असलेला प्राणी म्हणजे सिंह अशी व्याख्या केली जाते, तेंव्हा ती व्याख्या सिंहत्व' या समान गुणधर्माची असते. हा समान गुणधर्म ती व्याख्या ज्याचे वर्णन करते त्या वर्गातील सर्व सदस्यांना लागू पडते.

थोडक्यात वस्तूचे ज्ञान होणे म्हणजे व्याख्या करणे आणि व्याख्या नेहमी विशिष्टाची नसते तर सामान्यांची असते.या सामान्यालाच समान गुणधर्म म्हटले जाते. तो समान गुणधर्म किंवा 'सामान्य' हे त्या वस्तू, व्यक्तिच्या वर्तमानकालीन, भूतकालीन आणि भविष्यकालीन सर्व सदस्यांना लागू असते. या समान गुणधर्मांनाच प्लेटो **'आयडीया' (idea)** म्हणतो. ही आयडिया म्हणजे चेततनतत्त्व होय.आता, प्लेटो त्याची भाषा बदलून सामान्यालाच चेतनतत्त्व किंवा आयाडिया म्हणतो.

ही **आयडीया** हाच **ज्ञानाचा विषय** असतो. चेतनतत्त्वेच सत्यज्ञानाचा विषय असल्याने प्लेटोच्या सिध्दांताला चेतनावाद, चिद्‌वाद अथवा आयडियालिझम म्हणतात.

थोडक्यात,ही आयडिया शाश्‍वत, अमर, स्थिर, कायम, नित्य असते. ती कधीही बदलत नाही, अपरिवर्तनीय असते. आयडिया स्थिर, अपरिवर्तनशील, अविकारी, परिपूर्ण व अविनाशी असतात.त्यांचा कधी नाश होत नाही.त्या कधी जन्माला येत नाहीत त्या मरत नाहीत.त्या केवळ असतात.जगातील प्रत्येक वस्तू, पदार्थ, घटना, व्यक्ति, काल यांच्या आयडिया असतात. सौंदर्य, नीती, मूल्य, प्रेम, करुणा , भावना, मैत्री, संख्या, धर्म, गुणधर्म,संबंध,क्रिया या साऱ्या आयडिया आहेत.अशा आयडिया साहजिकच या मूर्त नाशवंत,अस्थिर जगात नसतात तर त्यांचे स्वतंत्र जग असते.त्या स्वर्गात वसत असतात. **आयडियांचे स्वतंत्र जग (The World of Ideas)** असते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## आयडीया आणि त्यांची वैशिष्ट्ये

1. **स्वयंभू :**

आयडीया स्वयंनिर्मित, स्वनियंत्रित स्वतंत्र असतात. त्या कुणावरही अवलंबून नसतात. विश्वच त्यांच्यावर अवलंबून असतात.

2. **सत्यता :**

प्लेटोच्या मते केवळ आयडीयाच ख-या असतात. त्या आयडीया ज्या दृश्य या व्यक्त होतात.ते दृश्य पदार्थ भासमान आहे. पण मानवाची आयडीया मात्र सत्य आहे.

3. **अतींद्रिय :**

आयडीयांचे ज्ञान ज्ञानेंद्रियांदवारे न होणारे अतिंद्रिय असते. ते केवळ प्रज्ञेला जाणवते.

4. **शाश्वत :**

आयडीया शाश्वत असतात. त्या उत्पन्नही होत नाहीत आणि नष्टही होत नाहीत. विश्वातील सर्व वस्तु किंवा व्यक्ती निर्माण होतील, नष्ट होतील पण आयडीया निर्माणही होत नाही व नष्टही होत नाही.

5. **स्थिर अपरिर्वनीय :**

आयडीया अपरिवर्तनीय, अविकारी व अविनाशी असतात. त्यांची व्याख्या करता येते. उदा.जगातील असंख्य सुंदर पदार्थ वस्तु व्यक्ती जन्म घेतात, नष्ट पावतात. पण सौंदर्य ही आयडीया अपरिवर्तनीय आणि अविकारी व अविनाशी असते.

6. **दव्ये :**

आयडीया द्रव्ये असतात. द्रव्ये म्हणजे मुलभूत साररुप असणे अंतिम सत्यत्व असणे.

7. **पूर्णत्व :**

आयडीयांमध्ये पूर्णत्व साठलेले असते.वस्तू कितीही चांगल्या आदर्श असल्यातरीही त्यांच्यात काहीतरी नून्यत्व अपूर्णत्व असते. पण आयडिया परिपूर्ण असते.

अशा आयडियांचे ज्ञान हे अचूक, सत्य व नित्य असते.ते उच्च पातळीवरील असते.आयडीयांचे जग जर इंद्रियानुभवाकडील असेल तर त्याचे ज्ञान होतेच कसे ? ज्या साधनाने आयडियांचे ज्ञान होते त्या साधनाला प्लेटो **मन, बुदधी** किंवा **अंत:प्रज्ञा** म्हणतो. तर्काने - बुध्दीने व्यक्तीला अंर्तज्ञान होते. अंत:प्रज्ञेचे साधन ज्याच्याकडे असेल त्यालाच या आयडीयांचे ज्ञान होते.

थोडक्यात, आयडीयांच्या जगाच्या ज्ञानाचे साधन म्हणजे बुदधी किंवा मन होय.

इंद्रिय गोचर वस्तूमधील जर व्यक्त अडकून राहीली तर ती मनाचा ज्ञाचे साधन म्हणून उपयोग करु शकणार नाही. जर तिला ज्ञान हवे असेल तर विषयवासनेतून बाहेर पडणे, इंद्रियोपभोगातून बाहेर पडणे आवश्यक आहे.असा जीवनमार्ग हा म्हणजे प्लेटोच्या भाषेत संन्यस्त वृत्तीने जगणे होय. या अर्थाने पहाता प्लेटोचे आयडीयाचे तत्वज्ञान धार्मिक तत्व ज्ञान आहे. संन्यासी होणे म्हणजे धर्मपालन करणे. ज्ञानाची साधना हेच सत्याचे दर्शन. ते धार्मिक जीवन असते, असे प्लेटो म्हणतो.

## निगमन व विगमन

एक असलेली आयडीया अनेक उदाहरणांनी समृदध होते. उदाहरणांनी तिचा सहभाग वाढतो व ती समृद्ध होते. जसे की मानव ही आयडीया एक आहे. पण तिचे उदाहरण असलेल्या मानवी व्यक्ती असंख्य असतात. मूळ आयडीया हे निगमनाचे आधार विधान असते. उदाहरणे विगमन असतात, म्हणजे विशिष्ट असतात. त्या

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



विशिष्टांमधून सामान्य स्वरूपाची आयडिया मिळते. विशिष्टांकडून सामान्यांकडे जाणे म्हणजे विगमन आणि सामान्यांकडून विशिष्टांकडे येणे म्हणजे निगमन होय.अशा रितीने सर्व समावेशक व्यापक परिपूर्ण व आदर्श आयडीया प्रत्यक्षातील वस्तूंच्या उदाहरणांमधून निगमनाने प्राप्त होते. नंतर निगमनाच्या साहाय्याने तिची विशिष्ट उदाहरणे प्राप्त होतात. निगमन व विगमन या दोन्ही रितींनी आयडिया लाभते.

## आयडीयांची श्रेणिरचना

प्लेटोच्यास आयडीया सिदधांतानुसार आयडीयांच्याही आयडीया असतात.अनेक आयडीयांचे तत्वसामान्य व एकत्व म्हणजे आयडीयांची आयडीया होय. पुन्हा अशा अनेक आयडीया असतात. त्याचे ही एक सारतत्व असते. तिला आयडीयांची आयडीया म्हणावे लागेल. अशा रितीने अनेक वस्तूंची आयडीया जशी असते, तसेच तशा अनेक आयडीयांची एक आयडीया असते हा क्रम असाच चालू असतो.

अशा रितीने आयडीयांमध्ये एकत्वही असते. अनेकत्वही असते त्यांचे मिळून बनणारे जग म्हणजे आयडीयांचे जग. अशा प्रकारे आयडीयांकडे पाहण्याच्या दोन दृष्टीकोन बनतात, असे प्लेटो म्हणतो. एका दृष्टीने आयडीयांमधील एकत्व प्राप्त होते. तर दुस-या दृष्टीने त्यांच्यात अनेकत्व मिळते. असे हे आयडीयांचे स्वरुप आहे.

## शिवतत्व - सर्वोच्च आयडीया

आयडियांची श्रेणिबध्द रचना असून या श्रेणितील सर्वोच्च आयडिया ही **'शिव' (The Good)** ची असते.हा **शिव म्हणजे ईश्वर (God)** असेही तो म्हणतो.ईश्वर ही आयडियांची आयडिया आहे.ती सर्वोच्च आयडिया आहे. ती कशी प्राप्त होते? तिचे ज्ञान कसे होते ?

प्लेटोच्या मतानुसार, निर्जीव वस्तूंप्रमाणे सजीवांच्याही आयडीया असतात. गाय, घोडा यांच्यात गायीत्व, अश्वत्व नावाची एक समान आयडीया असते.त्या आयडियानुसार तो प्राणी बनतो. पण गाय, घोडा, कुत्रा हे प्राणीही आहेत. त्यांच्यात म्हणजे या प्राण्यांमध्ये 'प्राणित्व' ही समान आयडिया असते. ती या आयडीया सर्व प्राण्यांच्यात समाविष्ट असते. याप्रमाणे निर्जीव व सजीव हे वरवर पाहाता वेगवेगळे वाटले तरी त्यांच्यातही एक समान आयडिया असते. ती 'द्रव्यत्व' नावाची आयडिया होय. द्रव्यतत्वाची आयडीया निर्जीव आणि सजीव दोघांना सामावून घेणारी आहे. ही अधिक व्यापक असते. अशा प्रकारे अधिकाधिक व्यापक आयडीया मिळत जाते. जेंव्हा जास्त व्यापक आयडिया मिळते तेंव्हा दोन परस्पर विरोधी आयडीयांमधील विरोध संपून जातो.

प्लेटो पुढे म्हणतो की अशा प्रकारे शेवटी अशी आयडीया मिळेल की जिच्यात जगातील सर्व पदार्थ आणि आयडीयात यांचा समावेश झालेला असेल, त्यांच्यातील विरोध संपला असेल. या सर्वाधिक व्यापक आयडीयास शिवतत्व असे म्हणतात. जगातील सर्व आयडीयांचा विरोध या शिवतत्वात मावळून जातो.जसे पाने, फुले, फांद्या, खोड हे झाडाचे भअग वरवर परस्परविरोधी असले तरी ते एकाच वृक्षाचे अंग बनल्यानंतर त्यांच्यातील विरोध संपुष्टात येतो, त्याप्रमाणे सर्वपदार्थांचा आणि आयडीयांचा विरोध शिवतत्व या आयडीयेत सामावून जातो.ती सर्वसमावेशक व्यापक आणि सर्वोच्च आयडिया असते. तिच्यानंतर काहीच आयडिया नसते.ते शिवतत्त्व प्राप्त करणे हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असते.तीच मुक्ति असते.

पण प्लेटो 'ईश्वर' या नावाचीही आयडिया असल्याचे सांगतो. मग या शिवतत्वाचा आणि ईश्वराचा काय संबंध आहे? असा प्रश्न उपस्थित होतो. कारण सर्वोच्च आयडीयापासूनच जग निर्माण होते, जगाचा प्रत्यय येतो.

Department of Philosophy, Sangamner College Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*


असे प्लेटो म्हणतो. मग दोन परस्पर भिन्न आयडीया प्लेटो मांडतो की एकाच तत्वाला तो दोन नावे देतो ? हा महत्वाचा प्रश्न बनतो. त्यासाठी ईश्वर आणि शिवतत्व यांचा संबंध तपासला पाहीजे. तो असा :

1. असे म्हणता येईल की ईश्वर हाच शिवतत्वाचे सुदधा कारण व अधिष्ठान आहे. ईश्वराच्या आधारावरच शिवतत्वाला अस्तित्व लाभते.

   पण असे म्हणण्यात अर्थ नाही करण प्लेटो शिवतत्वाला परिपूर्ण व स्वतंत्र समजतो.तेच जर कुणावर अवलंबून असेल तर त्यातेत त्याच्या स्वतंत्र व परिपूर्ण असल्यावर बाधा येईल.  त्यामुळे वरिल संबंध स्वीकारता येणार नाही.

2. मग ईश्वरचं शिवतत्वावर अवलंबून आहे का ?

   आहे, असे म्हणण्यातही अडचण आहे. कारण प्लेटो, ईश्वरालाही स्वयंभू स्वतंत्र मानतो. त्यामुळे ईश्वर शिवतत्वावर अवलंबून असू शकत नाही.

3. मग शिवतत्व आणि ईश्वर ही दोन स्वतंत्र तत्वे आहेत, असा पर्याय मान्य केला तर?

   मग  ही दोन्ही तत्वे स्वतंत्र असून आपापल्या परीने आपल्या क्षेत्रात ती परिपूर्ण व स्वतंत्र आहे. पण हाही पर्याय स्वीकारता येणार नाही. कारण तसे म्हटल्यास  सृष्टीच्या बुडाशी एकच तत्व आहे, असे प्लेटोच्या म्हणण्याला बाधा येते. दोन्ही तत्वे स्वतंत्र स्वीकारली तर ती एकमेकांना मर्यादीत करतील म्हणून ती स्वतंत्र ठरणार नाही.  म्हणून हाही पर्याय स्वीकारता येणार नाही.

4. मग काय करायचे ?

   असे दिसते की प्लेटोच्या दृष्टीने शिवतत्व आणि ईश्वर एकच आहे. एकाच तत्वाला तो कधी शिवतत्व तर कधी ईश्वरतत्व दोघांचेही गुणस्वरुप चैतन्यमय शाश्वत आहे.जगातील सर्व पदार्थांचे आधार म्हणून प्लेटो शिवतत्व हे नवे चेतनतत्त्व स्वीकारतो, असे म्हणावे लागते.

या शिवतत्त्वाची प्राप्ती करण हाच मोक्ष असतो. मुक्तिकडे जाण्याचा मार्ग हाच धार्मिक मार्गाचा अवलंब होय. प्लेटोच्या मते आयडीयांच्या प्राप्ती ही धार्मिक जीवनाची सुरवात असते. इंद्रियविजय मिळवून केली जाणारी ती तपस्या असते. तपस्येचे फलित म्हणजे ईश्वराची प्राप्ती, ईश्वरप्राप्तीनंतर वस्तुंच्या विरोधप्रमाणे माणसांना माणसांमध्ये विरोधसुदधा संपतो आणि भक्तच ईश्वर बनतो.

## ज्ञान म्हणजे पुनर्स्मरण / स्मृती ज्ञान  (Reminiscence)

प्लेटोच्या मते माणसाला ज्ञान नव्याने होत नसते.ते मुळातच असते.प्लेटोच्या मते माणसाला आत्मा असतो.आत्मा अनेक जन्म घेतो.आत्मा ज्ञानयुक्तच असतो.मानवी आत्माचे भाग असतात.त्या भागात ज्ञानाचे त्याला स्मरण होत असते.ज्ञानाचा विषय आयडिया असतात.आयडियांचे जग स्थिर व शाश्वत असते.त्यामुळे ज्ञानही तसेच असते. म्हणून ज्ञान म्हणजे आत्म्याला होणारे केवळ पुनर्स्मरण असते.

प्लेटोचा हा ज्ञान सिध्दांत दोन गृहीतकांवर आधारलेला आहे ती गृहीतके अशी :

**अ]  मानवाला निश्चित काहीतरी ज्ञान असते.**
**ब]  पण ते इंद्रिय संवेद्य नसते, तर स्मृतीयुक्त असते.**

स्मृतीचे ज्ञान कधी होते ? हे समजावून घेण्यासाठी प्लेटोची मानव विषयक उत्पत्ती पाहिली पाहिजे.ही उपपत्ती प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.तत्त्ववेत्ता जगाकडे आणि मानवी व्यक्तिकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो. त्यांची व्याख्या कशी करतो, यावर त्याचे तत्त्वज्ञान अवलंबून असते. म्हणून माणसाची व्याख्या महत्वाची असते.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## प्लेटोची मानवविषयक उपपत्ती (सिदधांत)

प्लेटो मानवी अस्तित्वाचे दोन भाग करतो: शरीर आणि आत्मा. विविध इंद्रियांचा संग्रह म्हणजे शरीर. आत्मा शरीराच्या आश्रयाने राहतो, पण शरीराचा भाग नसतो.परिवर्तनीय जग हा शरीराचा विषय आहे, तर अभौतिक दिव्य आयडियांचे जग हा आत्म्याचा विषय आहे.

याचा अर्थ असा की, ज्ञानाचे साधन ज्या स्वरुपाचे आहे. त्याच स्वरुपाचे ज्ञानाचे विषय सुदधा असतात. साधन, जड, परिवर्तनीय विनाशी असेल तर ज्ञानाचा विषयसुदधा तसाच असतो. आणि ज्ञानाचे साधन चैतन्यमय अविनाशी व अपरिवर्तनीय असेल तर ज्ञानविषयही तसाच असतो. पंचज्ञानेइंद्रियांचे संकुल असलेले शरीर जसे जड विनाशी आहे तसे त्यांचा विषय असलेले जगसुदधा जड व विनाशी आहे. त्याच समांतर पदधतीने बुद्धी चेतनय व अविनाशी आहे म्हणून तिचे ज्ञान असलेल्या आयडीयांचे जग सुद्धा चेतन अविनाशी आहे.

थोडक्यात प्लेटो मानवी अस्तित्वाचे जड शरीर आणि चेतनमय आत्मा असे भाग करतो आणि त्या प्रमाणे भासमान जग हा शरीराचा तर आयडीयांचे जग हे मनाचा, बुदधीचा विषय आहे, हे स्पष्ट करतो. प्लेटोच्या मते मानवी आत्म्याचे काही भाग करता येतात, याचा अर्थ भाग करणे याचा अर्थ तुकडे करणे असा नसून त्या भागाचे कार्य पाहणे होय. वेगळ्या भाषेत आत्म्याचे प्रकार करणे.ते असे :

**1.विवेकशील आत्मा (Rational )**

**2.विक्रमी व साहसी (Courageous)**

**3. वासनामय (Appetitive)**

यातील विवेकशील आत्मा विचार करणारा, साहसी साहस करणारा आणि वासनामय हा वासनांच्या मागे धावणारा आहे. शहाणपणा हा विवेकशील आत्म्याचा गुण आहे, धैर्य व साहस हा साहसी भागाचा गुण आहे.संयम हा वासनामय भागाचा गुण आहे. याचा अर्थ असा की बुध्दिपूर्वक विचार वागणे म्हणजे विवेकशील वागणे.म्हणजेच शहाणपणाने वागणे; तर धैर्य व साहसाचे प्रदर्शन करणे असते. तोच माणसाचा पुरुषार्थ असतो. विवेक किंवा शहाणपण हा सद्गुण आहे. म्हणून प्लेटोचा सद्गुण सिध्दांत थोडक्यात पाहिला पाहिजे.

## प्लेटोचा सद्गुण सिध्दान्त

लेटोने त्याच्या नीतिशास्त्राच्या मांडणीत सदगुणांचे महत्व सांगतो. आत्म्याच्या तीन प्रकारांशी जुळणारे चार सद्गुण आहेत, असे प्लेटो म्हणतो.ते चार सद्गुण असे:

**1. शहाणपणा / प्रज्ञान (Wisdom)**

**2. धैर्य (Courage)**

**3. संयम (Temperance)**

**4. न्याय (Justice)**

शहाणपणा हा विवेकशील आत्म्याचा गुण आहे, धैर्य व साहस हा साहसी भागाचा गुण आहे.संयम हा वासनामय भागाचा गुण आहे. याचा अर्थ असा की बुध्दिपूर्वक विचार वागणे म्हणजे विवेकशील वागणे.म्हणजेच शहाणपणाने वागणे.धैर्य व साहसाचे प्रदर्शन करणे यात माणसाचा पुरुषार्थ असतो.वासनोपभोगात त्याने संयम दाखविला तर त्याची विवेकशीलता सिध्द होते.हे सर्व सहकाराने,सुसंवादाने ठरविणे म्हणजे न्यायशीलता होय. न्याय याचा अर्थ या सर्वात समप्रमाण व संतुलन राखणे असते.याचा अर्थच असा की ज्या मनुष्यात त्याची विवेकबुध्दि, साहस आणि वासना यांच्यात सुसंवाद असतो, तोच खरा न्यायी मनुष्य असतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

सद्‌गुण म्हणजे ज्ञान हा सॉक्रेटीसचा सिध्दान्त प्लेटोला पूर्ण मान्य आहे. पण हे समीकरण वास्तवात कसे आणावे याचे मार्गदर्शन प्लेटो या आराखड्यानुसार देतो. आणि या दोघांचाही शिष्य ॲरिस्टॉटल ते प्रत्यक्षात कसे आणावे, हे सांगतो. त्याच्या मते केवळ त्याच माणसाला सद्‌गुणी म्हणावे जो आपली विवेकबुध्दि, भावना आणि इच्छा या तिघांमध्ये योग्य ते संतुलन राखतो, योग्य ते नाते जोडतो ! विवेक आणि अनावर इच्छा यांच्यात नेहमीच तीव्र संघर्ष चालू असतो.त्यात विवेकाच्या बाजूने जाणे हाच न्याय असतो, असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

या विवेकशील आत्म्यालाच ज्ञानाचे स्मरण होत असते. याचाच अर्थ ज्ञान हे नेहमीच अनुभवपूर्व असते.हे ज्ञान व्यक्तीला मुळातच प्राप्त झालेले असत. म्हणजे व्यक्ती मुळातच ज्ञानयुक्त असते. ज्ञान हा प्लेटोच्या मते आत्म्याच्या गुणधर्म असतो.

पण आता प्रश्न उपस्थित होतो की आत्म्यात हे ज्ञान येते कोठून? यावर प्लेटो म्हणतो की ईश्वर आत्म्यात ज्ञान घालतो. आता ईश्वर कुठून आला? तर त्याच्या मते ईश्वर ही सर्व श्रेष्ठ व सर्वांमधील मूलभूत आयडीया आहे. हा आयडीयारुपी ईश्वरच आत्म्यात ज्ञान स्थापतो.

आत्मा अमर आहे.तो फक्त शरीर बदलतो. पण शरीराबरोबर शरीराच्याच आहारी गेल्यामुळे आत्मा आपली ज्ञानशक्ती विसरतो.तो मताच्या पातळीवर जगू लागतो.असे असेल तर आता अचानक एखादयाव्यक्तीला आठवण कशी काय होते ? यावर प्लेटो म्हणतो ज्ञानाची आठवण होणे, म्हणजे पूर्वज्ञानाची स्मृती होणे असते.अशी स्मृती होणे घडले की व्यक्ति मग केवळ सत्यज्ञान प्राप्तीसाठीच जगते. तीच तिच्या विरक्त, संन्यस्त साधू जीवनाची पहाट असते.

------------------------------------

Department Of Philosophy, Sangamner College